**ग्रामीण पाणी पुरवठा जिल्हा परिषद बुलडाणा**

**ग्रा.पा.पु.विभागामध्ये विविध योजनोची नियोजन व आराखडा तयार करण्याची कार्यपध्दती**

**योजना**

## अ) केंद्र पुरकृत

**राष्टीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम**

## ब) राज्य पुरस्कृत

**जिल्हा वार्षिक योजना**

**अ )सर्वसाधारण योजना अंतर्गत पाणी पुरवठा योजनांची कामे**

**ब) विशेष घटक योजना अंतर्गत पाणी पुरवठा योजनांची कामे**

**क) म्हाडा/मिनीम्हाडा योजना अंतर्गत पाणी पुरवठा योजनांची कामे**

## क) खासदार स्थानिक विकास कार्यक्रम

## ड)आमदार स्थानिक विकास कार्यक्रम

## ई) जिल्हा परिषद पुरस्कृत

**ग्रामीण पाणी पुरवठा योजनांची देखभाल व दुरुस्ती**

**लघु नळपाणी पुरवठा योजना राबविणे**

**ग्रामीण पाणी पुरवठा अंतर्गत हातपंप व विघुतपंप देखभाल व दुरुस्ती करणे.**

**ग्रामीण पाणी पुरवठा जिल्हा परिषद बुलडाणा**

## योजनेचे निकषः-

गावाची निवड शासन परि.ग्रापाधो-११०९/प्र.क्र.-१०४(अ/पापु-०७दि.१७/३/२०१० मधील मार्गदर्शक सुचनानुसार खुल्या पध्दतीने व ग्रामसभेच्या सहमतीने अर्ज प्राप्त झाल्यावरच करावा.

नविन योजना देण्यापुर्वी गावाने जुनी योजना ,त्याची सर्व उपांगे ताब्यात घेतली आहेत व त्याचा वापर होत आहे. याची खात्री करावा.

प्रस्ताव सादर करतांना जिल्हयाची आर्थिक तरतुद विचारात घेऊन योजना मंजुर कराव्यात. ग्रामपंचायत कडुन प्राप्त झालेल्या अंदाजपत्रक व आराखडयामध्ये मागीतलेले शासन सहाय्य ठरवुन दिलेल्या निकषानुसार आहे.त्यात अनावश्यक जाद ा रक्कम वाढविलेली नाही.याची खात्री करुन घेणे आता जिल्हा परिषदेला एका गावाच्या योजनांना प्रशासकीय मंजुरी द्यावयाची नाही कारण ती ग्रामसभा देणार आहे. ग्रामपंचायतकडुन प्राप्त प्रस्ताव तपासुन त्याला आर्थिक निकषानुसार निधी उपलब्ध करुन देण्यास मान्यता द्यावयाची आहे.योजना मंजुर करण्यापुर्वी अथवा सुरु असतांना आवश्यकतेनुसार खात्री करण्यासाठी गावात जावुन तपासणी करणे.ग्राम पाणीपुरवठा व स्वच्छता समिती ग्राम सामाजिक लेखापरिक्षण समिती यांचे बरोबर सभा घेणे किंवा आवश्यकतेनुसार ग्रामसभा बोलावुन प्राप्त

**अहवालानुसार अथवा अन्यथा सर्व तरतुदीची प्रत्यक्ष अंमलबजावणी झाली याची खात्री करुन घेणे.**

**केंद्रशासन वेबसाईट- या योजनेची केंद्र शासनाची जनतेकरिता स्वतंत्र वेबसाईट आहे. या वेबसाईटचा पत्ता http://www.mdws.gov.in/ असा आहे.या साईटवर जिल्हानिहाय संपुर्ण कामनिहाय माहिती उपलब्ध होऊ शकते.**

**वित्त आयोग.**

**अ) केंद्र शासनाच्या वित्त आयोगाच्या शिफारशीनुसार पंचायत राज संस्थांना बळकटी करण्यासाठी जिल्हा परिषदेला निधी उपलब्ध होतो.सदर निधीतुन जिल्हा परिषद स्तर,पंचायत समिती स्तर,ग्रामपंचायत स्तर शासनाकडील मार्गदर्शक सुचनाप्रमाणे मंजुर कामाची अंमलबजावणी हया विभागामार्फत करण्यात येते.**

### जिल्हा परिषद स्तर.

**१ ) मोठया पाणी पुरवठा योजनांचे पुनरुज्जीवन व विस्तारीकरण.**

**२) तिर्थक्षेत्राचे ठिकाणी पाणी पुरवठा व स्वच्छता सोई सुविधा पुरविणे.**

### पंचायत समिती स्तर.

**१) शाळामध्ये शुध्द पाण्याची व्यवस्था.**

**२) अंगणवाडयांना शुध्द पाण्याची व्यवस्था.**

### ग्रामपंचायत स्तर.

**१) पाणीपुरवठा योजना दुरुस्ती व देखभाल.**

**२) खासदार स्थानिक विकास कार्यक्रम.**

**सदर योजनाअंतर्गत मा.खासदार यांचेकडुन त्यांच्या मंतदार संघात विविध विकास कामे प्रशासकीय मंजुरी देण्यासाठी मा.जिल्हाधिकारी यांचेकडे कामाची यादी प्रस्तावित करण्यात येते. मा.जिल्हाधिकारी यांचेकडुन प्रशासकीय मान्यता प्राप्त झालेल्या कामांची हया विभागामार्फत अंमलबजावणी केली जाते.**

## सदर योजनेतुन खालीलप्रमाणे कामे अनुज्ञेय आहे.

| अ.क्र | योजनेचे नांव/लेखाशिर्षकाचे नांव | कोणत्या विभागामार्फत प्रशासकीय मान्यतेची कार्यवाही केली जाते. |
|---|---|---|
| १ | राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम | ग्रामीण पाणी पुरवठा जिल्हा परिषद बुलडाणा |
| २ | पाणी टंचाई निवारणार्थ उपाययोजना अंतर्गत ता.न.पा.पु, न.पा.पु. योजना विशेष दुरुस्ती/टैंकर व बैलगाडीद्वारे पाणी, पुरवठा करणे ,विधन विहीर घेणे,खाजेगी विहीर अधिग्रहित, करणे ईत्यादी. | जिल्हाधिकारी कार्यालय बुलडाणा. |
| ३ | खासदार/आमदार निधी स्थानिक विकास कार्यक्रम | जिल्हाधिकारी कार्यालय बुलडाणा. |
| ४ | जिल्हा वार्षिक योजना | जिल्हाधिकारी कार्यालय बुलडाणा. |
| ५ | देखभाल दुरुस्ती(प्रादेशिक पाणी पुरवठा | ग्रामीण पाणी पुरवठा जिल्हा परिषद बुलडाणा |

| | | |
|---|---|---|
| | योजना) | |
| ६ | ग्रा.पा.पु.योजनांची देखभाल व दुरुस्ती प्रोत्साहन अनुदान | ग्रामीण पाणी पुरवठा जिल्हा परिषद बुलडाणा |

## ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद बुलडाणा

**कार्यकारी अभियंता हे या विभागाचे प्रमुख आहेत.या विभागाला केंद्र शासन,राज्यशासन,जिल्हा परिषद यांचेकडुन विविध योजनोंअतर्गत अनुदान प्राप्त होंते.सदर अनुदानातुन प्रामुख्याने बुलडाणा जिल्हयातील ग्रामीण भागातील पाणी पुरवठयाच्या योजना करणे त्याची देखभाल दुरुस्तीची कामे केली जातात. तांत्रिक कामकाज उदा.सर्वेक्षण,आराखडा अंदाजपत्रक तयार करणे,अंमलबजावणी, देखभाल व झालेल्या कामांचे मुल्यांकन,ग्रामीण पाणी पुरवठा विभागामार्फत केली जाते. मा.खासदार,आमदार,स्थानिक लोकप्रतिनिधी,मा.पदाधिकारी,गटविकास अधिकारी यांचेकडुन आलेल्या प्रस्तावांचे तांत्रिक छाननी करुन सक्षम प्राधिकरणाकडुन सर्वेक्षण मंजुरी घेऊन उपलब्ध अनुदानानुसार सदर प्रस्तावाची अंमलबजावणी केली जाते.ही कामे कार्यकारी अभियंता, उपअभियंता,शाखा अंभियंता यांचे पर्वेक्षणाखाली पुर्ण केली जातात.खालील योजनांची प्रशासकीय मंजुरी ज्या त्या विभागामार्फत दिली जाते.व त्याची अंमलबजावणी व तांत्रिक मंजुरी देणे,कामे सुरु करणे व पुर्ण करण्याची कार्यवाही ग्रामीण पाणी पुरवठा विभागामार्फत केली जाते.**

# ई -पाणी

**ग्रामीण भागातील जनतेच्या पाणी पुरवठा तक्रारीच्या निवारणासाठी ई-पाणी या नावाने थेट इंटरनेटवर तक्रारी दाखल करण्यासाठी वेबसाईट उघडण्यास आलेली आहे.या सुविधेचे उदघटन मा.मुत्री पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग महाराष्ट्र शासन यांचेहस्ते १ मे २०१० रोजी करण्यात आलेली आहे.(Web site:- http://epani.maharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध आहे.**

## ई -पाणी तक्रार प्रणालीचे फायदे

**१) ग्राहकांना तक्रार करण्यासाठी संबंधित कार्यालयात जावे लागणार नाही .**

**२) नोंदविलेल्या तक्रारीचे निवारण करणेसाठी जबाबदारी निश्चित केलेल्या कार्यालयाबाबत ग्राहकास समजु शकते.**

**३) यापुर्वी अशाप्रकारे तक्रार नोंदणीसाठी एकत्रित प्रणाली उपलब्ध नव्हती.आता या प्रणालीमुळे तक्रारीबाबतची सर्व माहिती एकत्रितपणे उपलब्ध होणार आहे.**

**४) तक्रार प्राप्त झाल्यानंतर संबंधीत यंत्रणेमार्फत तक्रारीबाबत योग्य ती पाहणी करुन यंत्रणेस तक्रारीचे निराकरण.**

**५) करणेबाबत सुचना देण्यात येतील. त्यामुळे ई पाणी वेबसाईटचा ग्राहकांनी जास्तीत जास्त वापर करणेसाठी बुलडाणा जिल्हयातील ग्रामीण पाणीपुरवठा योजनच्या ग्राहकांना आपल्या तक्रारीचे निराकरण करुन घेणेसाठी ग्रामीण पाणी पुरवठा विभाग जि.प.बुलडाणा मार्फत आवाहन करण्यात येत आहे.**